महकारी गृहनिर्माण संस्थांना जमीन
देण्याच्या संबंधातील धोरण

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन पूरकपत्र क्रमांक: एलसीएस-१०९५/प्र.क्र. ३७/९५/ज-१
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक- ८ जानेवारी, २००१

वाचा: शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक: एलसीएस-१०९५/प्र.क्र. ३७/९५/ज-१, दिनांक ९ जुलै १९९९

पुरकपत्र

वरील दिनांक ९ जुलै १९९९ च्या शासन निर्णयासोबतच्या प्रपत्र `ब` मधील अट क्रमांक १० व ११ ऐवजी अट क्रमांक १० म्हणून पुढील मजकूर वाचण्यात यावा. तसेच यापुढील अनुक्रमांक १२ ते १९ ऐवजी अनुक्रमांक ११ ते १८ असे वाचण्यात यावेत:-

"अट क्रमांक १०- सहकारी गृहनिर्माण संस्थंना शासकीय जमीन मंजूर करतांना त्या संस्थेतील सदस्याला त्याची सदनिका/घर शासनाला समर्पित करण्याची अट लागू असणार नाही. त्याचप्रमाणे अशा संस्थेतील सदस्याने त्याची सदनिका/घर भाड्याने देण्यासाठी संबंधीत जिल्हाधिकारी यांचेकडे अर्ज केल्यापासून तीन महिन्यांच्या आत त्यावर योग्य ती कार्यवाही न झाल्यास अशा सदस्याला त्याची सदनिका /घर कोणासही भाडेपट्टीने/पोट भाडेपट्टीने अथवा लिव्ह ॲण्ड लायसन्स अटीवर देण्याची मुभा राहील., मात्र त्याकरीता अशा सदस्याला वरील हस्तांतरण फी च्या रकमेच्या ५ टक्के दराने अधिमुल्य प्रतिवर्षी संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे भरणा करावी लागेल. सदनिका भाडयाने दिल्यापासून पुढील दोन महिन्यांत अशा अधिमूल्याची वार्षिक रक्कम न भरल्यास (भाडयाच्या मुदतीच्या कालावधीत किंवा एक वर्ष जी जास्त असेल ती) दुप्पट रक्कम दंड म्हणून वसूल करण्यात यावी."

(स. शो. पडवेकर)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,